# मुंबई मेट्रोच्या दोन्ही प्रणालींसाठी निविदाकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

■ मुंबई, प्रतिनिधी

आज मुंबई मेट्रो ३ च्या डेपोच्या यांत्रिकीकरण आणि विद्युतीकरण प्रणालींसाठी निविदाकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यात डिझाईन, सप्लाय, स्थापना, चाचणी आणि प्रत्यक्ष प्रकल्पाची सुरुवात या कामांचा समावेश आहे. या निविदा प्रक्रियेत व्होल्टास लि., ब्लूस्टार लि., इटीए आणि मे. पोलीकॅब संयुक्तिक, मे. जॅकसन लि., मे.स्टर्लिंग आणि विल्सन प्रा.लि, मे.सॅम इंडिया बिल्टवेल प्रा.लि. या कंपन्या निविदा प्रक्रियेत सहभागी झाल्या आहेत. तसेच शासन निर्देशित मेक-इन -इंडिया मोहिमेंतर्गत या प्रणालींमध्ये स्थानिक उद्योजकांना प्राधान्य देण्यात येणार असल्याचे एमएमआरसीच्या व्यवस्थापकीय संचालिका अश्विनी भिडे यांनी सांगितले.

यावेळी बोलताना भिडे म्हणाल्या, निविदाकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहून आम्हाला आनंद होत आहे. ट्रेन - डेपोचे कामकाज आणि देखभाल ही अत्याधुनिक आणि उत्कृष्ट विद्युतीकरण यांत्रिकीकरण प्रणालीच्या सहाय्याने करण्यात येणार आहे. त्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.